## रु. ५००/- मूल्याच्या नोटांचा अस्वीकार केला जाण्याबाबत

डी सी एम.३००/०८.०४.२१/२०००-२००१

जानेवारी ५, २००१

अध्यक्ष
सर्व वाणिज्य व सहकारी बँका

प्रिय महोदय,

**रु. ५००/- मूल्याच्या नोटांचा अस्वीकार केला जाण्याबाबत**

**१.** आमच्या असे निदर्शनास आले आहे की काही बँक शाखा रु. ५००/- मूल्याच्या नोटा स्वीकारत नाहीत किंवा भरणा-यांकडून त्यांच्या क्रमांकाची इ. नोंद करवितात.

**२.** आणि म्हणून, आम्ही आपले लक्ष आमचे पत्र, डीसीएम.क्र.९२७/०८.०६.०१/९७-९८ दिनांक १८ जून, १९९८ कडे वेधून पुनः एकदा स्पष्ट करतो की, रिझर्व बँकेने वेळोवेळी प्रसृत केलेल्या रु ५०० मूल्याच्या नोटा हे वैध चलन आहे व सर्व व्यवहारांमध्ये त्या मुक्तपणे स्वीकारल्या जाव्यात.

**३.** अलिकडेच काही काळापूर्वी रिझर्व बँकेने दिलेल्या, रु ५००/- च्या नोटांच्या रंगयोजनेबद्दल दिलेल्या जाहिरातीकडे आम्ही आपले लक्ष वेधू इच्छितो. त्यात जनतेला आव्हान करण्यात आले होते की त्यांनी त्यांच्या जवळील जुन्या हिरव्या रंगातील रु ५००/- च्या नोटा (वॉटरमार्क-झरोक्यात अशोक स्तंभ असलेल्या) बदलून नवीन डिझाईनच्या रु ५००/- च्या नोटा बदलण्यासाठी जनतेला दिलेली ही केवळ एक सूविधा आहे. नोटा न स्वीकारण्यासाठी हे कारण बँकांनी देऊ नये असे आम्ही स्पष्टपणे सांगत आहोत.

४. यासाठी आपण कृपया ताबडतोब आपल्या सर्व शाखांना, त्यांनी मुक्तपणे सर्व रु ५०० च्या नोटांचा स्वीकार करण्याचे निदेश देऊन जनतेच्या मनातील भीति निर्माण करणे टाळावे.

५. कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासू

सही/-
(सी. कृष्णन)
मुख्य व्यवस्थापक